नि.फौ.ख.क्र. १९४/२०२३
सरकार –वि– राहुल चौधरी व इतर
नि.क्र. ३२२

**<u>सरकार तर्फे साक्षीदार क्रमांक १४ यांची जबानी</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो कीः–
माझे नाव — महेश प्रेमकिशार श्रीवास,
वय. ३६ वर्षे, व्यवसाय — शिपाई, नगर परिषद, बुलडाणा,
राहणार — बुलडाणा, ता. जिल्हा – बुलडाणा.

**<u>सरतपासणी सरकार तर्फे श्रीमती एस. व्ही. इंगळे, सहाय्यक सरकारी अभियोक्ता.</u>**

०१. दि. २८.०६.२०२३ रोजी मला पंच म्हणून आर्थिक गुन्हे शाखा, बुलडाणा येथे जाण्यास मुख्याधिकारी नगर परिषद बुलडाणा यांनी आदेशीत केले होते. आता मला माझ्या वरिष्ठांनी मला दिलेले पत्र दाखविण्यात आले. त्यावर माझ्या वरिष्ठांची सही आहेत. त्यातील मजकूर बरोबर आहे. ते **<u>नि.क्र.३१६</u>** वर आहे. त्यानुसार मी दि. ३०.०६.२०२३ रोजी आर्थिक गुन्हे शाखा, बुलडाणा येथे हजर होतो. त्यावेळेस आरोपी राहुल चौधरी यांनी माझ्या समक्ष आर्थिक गुन्हे शाखा येथे बयाण दिले होते. राहुल चौधरी यांनी माझ्या समक्ष सांगितले की, सोन्याच्या वस्तु व मोबाईल बामणपुर येथील माझ्या घरुन काढून देतो. ज्या ठिकाणावरुन राहुल चौधरी वस्तु काढून देणार होता ते घर राहुल चौधरी यांच्या मालकीचे होते. आता मला आरोपीने माझ्या समक्ष दिलेले निवेदन दाखविण्यात आले. त्यावर माझी, प्रसंजीत इंगळे व तपासी अधिकारी व आरोपी राहुल चौधरी यांची सही आहे. त्यानुसार मी पोलीसांसोबत बामणपुर फैजपुर येथे गेलो होतो. निश्चित ठिकाण आता मला आठवत नाही. त्याठिकाणावरुन पोलीसांनी मोबाईल व सोन्याचे दागीणे राहुल चौधरी यांच्या घरुन जप्त केले. त्याठिकाणी माझ्या समक्ष पंचनामा करण्यात आला. आता मला मेमोरंडम पंचनाम्यातील मजकूर वाचून दाखविला असता तो बरोबर आहे. त्यावर माझी सही, दुसरा पंच प्रसंजीत इंगळे, तपास अधिकारी व राहुल चौधरी यांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. ते **<u>नि.क्र.३१७</u>** वर आहे. आता मला एक सोन्याची पोथ, दोन सोन्याची चैन, कानचैन, अंगठी, एक बेसर, चांदीच्या चैनपट्‌ट्या, एक सोन्याची रुद्राक्ष कडी दाखविण्यात आली. त्या त्याच आहेत. सोन्याच्या पोथला **<u>वस्तुचिन्ह–अ</u>**, दोन सोन्याच्या चैनीला **<u>वस्तुचिन्ह–ब</u>**, सोन्याची कानचैनला **<u>वस्तुचिन्ह–क</u>**, सोन्याची अंगठी व बेसरला **<u>वस्तुचिन्ह–ड व इ</u>**, व सोन्याच्या रुद्राक्ष कडीला **<u>वस्तुचिन्ह–फ</u>** देण्यात येते. चांदीच्या चैनपट्टीला

**वस्तुचिन्ह–ग** देण्यात येते.

०२. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर पंच क्र.२ म्हणून माझी सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. ते **नि.क्र.३१८** वर आहे. आता मला एक काळ्या रंगाचा मिडनाईट आयफोन दाखविण्यात आला. त्याचा आय.एम.ई.आय नं. ३५३३४६५४०२५२५३३ असा आहे. तो तोच आहे. त्याला **वस्तुचिन्ह–अ १** देण्यात येते. आता मला सॅमसंग गॅलेक्सीचा मोबाईल फोन दाखविण्यात आला. तो काळ्या रंगाचा होता. तो तोच आहे. त्याचा आय.एम.ई.आय नं. ३५०९७३४२५५८११९० असा आहे. त्याला **वस्तुचिन्ह–अ २** देण्यात येते. आता मला गॅलेक्सी ए १४ चा मोबाईल फोन दाखविण्यात आला. त्याचा आय.एम.ई.आय नं. ३५००३१४७४३८७०१३ असा आहे. त्याला **वस्तुचिन्ह–अ ३** देण्यात येत आहे. आता मला दुसरा जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर पंच क्र.२ म्हणून माझी सही, तपासी अधिकारी व राहुल चौधरी यांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. तो **नि.क्र.३१९** वर आहे. दि. ३०.०६.२०२३ रोजी माझ्या समक्ष काळ्या रंगाची बोलेरो गाडी आरोपी राहुल चौधरी यांच्याकडून जप्त करण्यात आली होती. त्याचा जप्ती पंचनामा करण्यात आला. आता जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, तपासी अधिकारी व आरोपीची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. ते **नि.क्र.३२०** वर आहे. बोलेरो गाडी मी बघितली तर ओळखु शकतो. त्याच दिवशी बोलेरो पिकअप गाडी जप्ती पंचनामा तयार करुन माझ्या समक्ष जप्त करण्यात आली. आता मला जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी, तपासी अधिकारी व आरोपी राहुल चौधरी यांची सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. ते **नि.क्र.३२१** वर आहे. दोन्ही चारचाकी वाहन राष्ट्रीय महामार्ग क्र. ६ वर असलेल्या निकी हॉटेल, भुसावळ येथून जप्त करण्यात आल्या. मिडनाईट आयफोन बामनोद येथून आरोपी राहुल चौधरी यांच्या घरुन जप्त करण्यात आला होता. बामनोद येथील घर कोणाच्या मालकीचे होते हे मला आता आठवत नाही. उर्वरित दोन मोबाईल फोन आर्थिक गुन्हे शाखा, बुलडाणा यांच्या कार्यालयात जप्त करण्यात आले. आरोपी राहुल चौधरी याला मी ओळखु शकतो. आरोपी राहुल चौधरी आज न्यायालयात हजर नाही. राहुल चौधरी हा न्यायबंदीस्त असल्यामुळे तुरुंगात आहे व त्याला तुरुंगातून न्यायालयात हजर केले नाही. हे म्हणणे खरे आहे की, मी फैजपुर पोलीस स्टेशनच्या अंतर्गत बामनोद गावी गेलो होतो. हे म्हणणे खरे आहे की, बामनोद येथील घर राहुल चौधरी यांच्या अक्कडसासु जावळे यांच्या मालकीचे होते असे लिहिण्यात आलेला पंचनाम्यातील मजकूर बरोबर आहे.

**<u>सरतपास संपला.</u>**

**<u>उलटतपास आरोपी क्र. १ व ५ तर्फे श्रीमती व्ही. व्ही. कुमकुले, वकील यांचे मार्फत.</u>**

०३. हे म्हणणे खरे नाही की, निवेदन पंचनाम्यातील लिखापडी आधीच पोलीस स्टेशनला करण्यात आली होती. निवेदन पंचनामा मी वाचला नव्हता. निवेदन पंचनाम्यातील मजकूर आरोपीला वाचून दाखविण्यात आले होते. आरोपीने आमच्या समक्ष सह्या केल्या होत्या. मला बामणपुर येथील घर दाखविता येईल. घराच्या बाजुला पोलीस चौकी होती. घराच्या चतुःसिमा मला सांगता येणार नाहीत. पंचनामा दुपारी ०२.०० ते ०३.०० च्या दरम्यान झाला होता. पोलीसांनी जप्त केलेल्या सोन्याच्या पावत्या माझ्या समक्ष मागितल्या होत्या की काय हे आता मला आठवत नाही. मी सोन्याच्या पावत्या बघितल्या नव्हत्या. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष सोने जप्तच झाले नाही त्यामुळे मी सोन्याच्या पावत्या बघितल्या नाहीत. सोन्याच्या पावत्या कोणाच्या नावावर होत्या हे आता मला आठवत नाही. जप्त केलेल्या मोबाईलचे मॉडेल नंबर व आय.एम.ई.आय. नंबर मला सांगता येणार नाही कारण की मला ते आता आठवत नाही. जप्त केलेले वाहन कोणत्या कंपनीचे होते हे मला सांगता येणार नाही. मोबाईल व गाडीच्या पावत्या मी बघितल्या होत्या की काय हे आता मला आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समक्ष काहीच जप्त न झाल्यामुळे मला ते आता आठवत नाही. हे म्हणणे खरे नाही की, आर्थिक गुन्हे शाखा येथे जावून मी फक्त सह्या केल्या आहेत व माझ्या समक्ष कोणताही पंचनामा करण्यात आला नव्हता. हे म्हणणे खरे नाही की, मी आज खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास आरोपी क्र. ३ व ४ तर्फे श्री. ए. पी. इखारे, वकील यांनी नाकारला.</u>**

**<u>उलटतपास आरोपी क्र. २ चे विधीज्ञ श्री. जी. एच. इंगळे गैरहजर व आरोपी क्र. ६ चे विधीज्ञ श्री. जी. व्ही. पिसे यांनी नाकारला.</u>**

**<u>उलटतपास संपला.</u>**

**<u>फेरतपास काही नाही.</u>**

| श्रवणोत्तर स्विकृत | माझे समक्ष |
|---|---|
| ( एन. डी. मेश्राम ) | ( एन. डी. मेश्राम ) |
| न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव | न्या.दं.प्र.वर्ग कोर्ट क्र.१, शेगांव |
| दि.०६.१०.२०२५ | दि.०६.१०.२०२५ |